# पोलीस वार्तापत्र

पोलीस अधिक्षक कार्यालय, गडचिरोली
दि. 03.11.2018

गडचिरोली जिल्हयाचा बहुतांश भाग हा अतिदुर्गम/नक्षलग्रस्त असल्याने जिल्हयात शासनातर्फे राबविण्यात येणाऱ्या विविध योजनेतुन दुर्गम भागातील नागरीक अनभिज्ञ असल्यामुळे शासनामार्फत राबविण्यात येत असलेल्या योजना व उपक्रम यांचा लाभ सहजासहजी दुर्गम भागातील आदीवासी नागरीकांना मिळत नाही. येथील जनता विकासात्मक व पायाभुत सुविधांपासुन वंचित आहे. त्यामुळे त्यांचा सर्वांगीण विकास खुंटला असल्याचे निदर्शनास येते. जिल्हयात नक्षल समस्या फोफावत असल्याने त्यांचा बिमोड करणे हे पोलीसांचे प्रथम उद्दीष्ट आहे. त्यामुळे नागरीक, महीला तसेच विदयार्थी यांना त्यांच्या हक्कांची जाणीव करुन देणे, शासनाच्या मुलभुत सुविधांचा लाभ मिळवुन देणे तसेच दुर्गम भागातील विदयार्थी यांना उत्तम दर्जाचे व मोफत शिक्षण देणे ही आजची काळाची गरज आहे. त्यामुळे "मावा पोलीस स्टेशन, मावा ज्ञानमंदीर" या उक्तीस सार्थ करण्यासाठी मा. पोलीस अधिक्षक श्री. शैलेश बलकवडे यांचे संकल्पनेतुन गडचिरोली पोलीस विभागाकडुन **प्रयास 'PRAYAS"( Police Reaching out to Youth and Students)** उपक्रम राबविण्यात येणार असुन आता "बंदुक नको, वही-पुस्तक हवे" या करीता सदर प्रयास या उपक्रमाअंतर्गत पोस्टे/उपपोस्टे/पोमके/उपविभाग त्याबरोबरच जिल्हा पातळीवर सुद्धा 1) शाळा व आश्रमशाळांना भेटी उपक्रम, 2) कौशल्य व विकास कार्यक्रमांची अंमलबजावणी, 3) अतिसंवेदनशिल भागात यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विदयापीठाच्या अभ्यास केंद्राची निर्मीती, 4) स्पर्धा परीक्षा तसेच मार्गदर्शन शिबीराचे आयोजन, 5) करीअर मार्गदर्शनपर कार्यक्रमांचे आयोजन, 6) रोजगार मेळाव्याचे आयोजन तसेच 7) ग्रामस्तरीय युवक - युवतींशी चर्चा करण्याचे माध्यमातुन Knowledge ग्रुप तयार करणे इ. उपक्रमांची अंमलबजावणी करण्याचे पोलीस प्रशासनाचे नियोजन आहे. 8) ग्रंथालय निर्मीती करुन वाचन संस्कृती रुजविण्यासाठी प्रयत्न करतील.

सदर उपक्रमांतर्गत उपविभागीय पोलीस अधिकारी तसेच पोस्टे/उपपोस्टे/पोमके प्रभारी अधिकारी हे नक्षल प्रभावित परीसरातील जि.प तसेच आश्रमशाळा व महाविदयालयांना भेटी देणार असुन तेथील विदयार्थ्यांना आवश्यक शैक्षणिक साहीत्य, क्रिडा साहीत्य वाटप करणार असुन विदयार्थ्यांच्या समस्या जाणुन घेवुन त्या सोडविण्याचा प्रयत्न करण्यात येणार आहे. या भेटी दरम्यान विदयार्थ्यांच्या कला कौशल्याची माहीती घेण्यात येणार असुन विविध क्षेत्रात पारंगत असलेले विदयार्थ्यांचा शोध घेवुन त्यांची माहीती संग्रहीत करुन त्यांना हक्काचे व्यासपीठ उपलब्ध होईल याबाबत पोलीस प्रशासन प्रयत्न करणार आहे. त्याचबरोबर 30 ते 50 होतकरु आदीवासी विदयार्थ्यांची निवड करुन त्यांना जिल्हास्तरावर प्रवेश देवुन स्पर्धा परीक्षा केंद्रामार्फत पुढील भविष्याचे नियोजन करण्याबाबत मार्गदर्शन करण्यात येणार आहे.

जिल्हयातील अतिसंवेदनशिल नक्षलग्रस्त क्षेत्रातील शाळाबाहय तसेच अनेक कारणांनी शिक्षण सोडलेल्या विदयार्थ्यांना पुढील शिक्षण घेता यावे म्हणुन यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विदयापीठाचे अभ्यास केंद्र जिल्हयातील दुर्गम भागातील पोलीस मदत केंद्राचे परीसरात सुरु करण्यात येणार आहेत. सदर उपक्रमा अंतर्गत मोफत शिक्षणाची सोय उपलब्ध करुन देण्याचा

पोलीस प्रशासनाचा मानस आहे. नुकतेच गॅरापत्ती, पेंढरी, दामरंचा, हेडरी व ताडगाव या नक्षलग्रस्त परीसरात मुक्त विदयापीठाचे अभ्यास केंद्र सुरु करण्यात आले असुन त्यामध्ये 623 विदयार्थ्यांनी आपला प्रवेश नोंदविला आहे.

त्याचप्रमाणे पोस्टे/उपपोस्टे/पोमके स्तरावर सुशिक्षीत बेरोजगार युवक - युवतींचा शोध घेवुन त्यांचेकरीता नोकरीची संधी उपलब्ध व्हावी या उदात्त हेतुन रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात येणारआहे. तसेच अशा विदयार्थ्यांचे मोबाईल क्रमांक घेवुन त्यांचा व्हॉट्सॲप ग्रुप तयार करण्यात येवुन त्याद्वारे नोकरीविषयक जाहीराती, आरोग्य विषयक माहीती, रोजगाराविषयी माहीती पाठवुन पोलीस प्रशासन तसेच शासनाप्रती विश्वास वृद्धींगत कसा होईल याबाबत कसोशीने प्रयत्न करण्यात येणार आहे. तसेच शिक्षणापासुन नौकरी मिळेपर्यत पोलीस विभाग युवकांच्या पाठीशी राहुन रोजगार उपलब्ध करुन त्यांना आत्मनिर्भर होण्यास मदत करणार असुन पोलीस मदत केंद्रे ही ज्ञानमंदिरे म्हणुन उभे राहणार आहेत.

गडचिरोली जिल्हा हा उदयोगविरहीत गणला गेला आहे. येथील आदीवासी युवक-युवतींना आपला विकास करुन या प्रवाहात सामील होता यावे म्हणुन गडचिरोली पोलीस प्रशासनाद्वारे उपरोक्त उपक्रम राबविण्यात येणार आहेत. तरी ज्या कोणास या उपक्रमाअंतर्गत मदत करण्याची ईच्छा असल्यास त्यांनी नागरी कृती शाखा, पोलीस अधिक्षक कार्यालय गडचिरोली येथे संपर्क करण्याबाबत गडचिरोली पोलीस प्रशासनाद्वारे आवाहन करण्यात येत आहे.